ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूर जिल्हा शेतकरी कामगार पक्ष व संयुक्त महाराष्ट्र चळवळ



**महेश ज. साखरे[1] & डॉ. संजय एस. गायकवाड [2]**

[1]पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विभाग प्रमुख, इतिहास सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

[2]एम.एच.एम. कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब, सोलापूर

## प्रस्तावना :

अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्षाला महाराष्ट्राच्या सामाजिक,सांस्कृतिक इतिहासाची प्रदीर्घ परंपरा लाभलेली आहे. बुद्धीप्रमाण्यावाद आणि समता यावर आधारित हा पक्ष होता.इ.स.1873 साली जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला होता. ग्रामीण जीवनात खोलवर रुजलेली ही पहिली चळवळ होती.इ.स.1947 मध्ये स्थापन झालेल्या या शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी,कामगार,कष्टकरी वर्गांच्या विकासासाठी अनेक माध्यमातून यशस्वी कार्य केले.याशिवाय इ.स.1948 नंतर देशात भाषिक तत्वावर आधारित प्रांतांच्या पुनर्रचनेच्या मागणीने जोर धरला असता तत्कालीन मुंबई राज्यात शेतकरी कामगार पक्षानेभाषिक तत्वावर आधारित मुंबईसह मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची मागणी केली.त्याचप्रमाणे मुंबई राज्यातील सर्व मराठी भाषिक जिल्ह्यातील जनतेला मुंबईसह मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी प्रेरित करण्याचे कार्य केले.

## संशोधनाचे उद्देश :

1) शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेचा अभ्यास करणे.
2) शेतकरी कामगार पक्षाची ध्येयधोरणाचा आढावा घेणे.
3) सोलापूर जिल्ह्यातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शेतकरी कामगार पक्षाचे योगदान अभ्यासणे.

## संशोधनाची गृहितके :

1) इ.स. 1950 च्या दशकात मुंबई इलाख्यात उदयास आलेल्या राजकीय पक्षांपैकी शेतकरी कामगार पक्ष हा एक महत्वाचा पक्ष म्हणून गणला जातो.
2) शेतकरी कामगार पक्षाची ध्येयधोरणे हि शेतकरी व कामगार यांच्या विकासाला प्राधान्य देते.
3) शेतकरी कामगार पक्षाचे महत्वपूर्ण योगदान संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आणि त्यानंतरच्या महाराष्ट्रातील विविध चळवळीमध्ये राहिले आहे.

4) सोलापूर जिल्ह्यातील जनतेमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रचार प्रसार करण्यात शेतकरी कामगार पक्षाची राजकीय, वैचारिक भूमिका प्रमुख राहिलेली आहे.

### संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला गेला आहे

### तथ्य संकलन पद्धती :

सदर संशोधनाकरिता अनेकविध ऐतिहासिक संदर्भ साधनांचा वापर केला गेला आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शेतकरी कामगार पक्षाच्या योगदानाचा आढावा घेण्याकरीता तत्कालीन ग्रंथांचा, कागदपत्रे, स्थानिक वृत्तपत्रे, मासिकांचा वापर करून तथ्य संकलन केले आहे.

### महत्वपूर्ण शब्दावली :

भाषावार प्रांतरचना,संयुक्त महाराष्ट्र चळवळ, दाभाडी प्रबंध इ.

### शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेचा इतिहास :

इ.स.1873 साली जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला होता. ग्रामीण जीवनात खोलवर रुजलेली ही पहिली चळवळ होती. भारतीय शेतकरी कामगार पक्षाला जोतीराव फुले यांच्या या सत्यशोधक समाजाचा वैचारिक वारसा, तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. जोत्तीराव फुले व सत्यशोधक समाजाचा कार्याचा वसा घेऊन पुढे श्री भाऊसाहेब राऊत यांच्या नेतृत्वाखाली इ.स.1948 मध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, राऊत या नेत्यांनी कॉंग्रेसमध्ये शेतकरी कामगार पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. परंतु कॉंग्रेस पक्षात स्वतंत्र संघटना स्थापन करण्याची बंदी घालण्यात आलेली होती. तेव्हा शंकराराव मोरे, भाऊसाहेब राऊत यांनी 26 एप्रिल 1948 रोजी स्वतंत्र शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. शेतजमीन धारणे ची कमाल मर्यादा घालणे, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे, शेतकरी व कामगारांचे प्रश्न सोडविणे, दलित समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करणे इत्यादी या पक्षाची ध्येय धोरणे होती. बहुजन समाजाचे नेतृत्व करणारे पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्ष ओळखले जात होते. पुढे इ.स. 1960 च्या दशकात सुरू झालेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत देखील शेतकरी कामगार पक्ष हा आघाडीवर होता. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, दत्ता देशमुख, एन. डी. पाटील, दत्ता पाटील, तूळशीदास जाधव, गणपतराव देशमुख, दि.बा. पाटील इत्यादी प्रभावी नेतृत्व या पक्षाला लाभले होते. इ.स.1952 मध्ये पार पडलेल्या मुंबई राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाला जवळपास 14 जागा मिळाल्या.

## शेतकरी कामगार पक्षाची ध्येयधोरणे :

इ.स.1947 मध्ये पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षाने खालीलप्रमाणे आपली ध्येयधोरणे निश्चित केली होती.

1) खासगी उद्योगांच्या नफ्यावर नियंत्रण ठेवणे.
2) शेतकरी कामगार यांचे प्रश्न सोडविण्यास सर्वोच्च प्राथमिकता देणे.
3) भांडवलदार, भ्रष्ट राज्यकर्ते इ.चा विरोध करणे.
4) शेतकरी मालाला योग्य ती किमंत मिळवून देणे.
5) देशातील प्रमुख उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करणे.
6) विविध प्रश्नावर जनसमुहाला संघटीत करून त्यांचे लढे उभा करणे आणि सरकारवर जनसमूहाच्या चळवळीचे दडपण आणून त्यास चुकीच्या धोरणात सुधारणा करावयास भाग पाडणे.

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाचे संयुक्त महाराष्ट्र चळवळतील कार्याचा थोडक्यात आढावा :

सोलापूर जिल्ह्यातील पेनुर येथे आमदार तुळशीदास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 11 एप्रिल 1948 रोजी दुपारी चार वाजता मोहोळ तालुका शेतकरी परिषद यशस्वीपणे पार पाडली गेली. या परिषदेस साताऱ्याचे क्रांतीसिंग व पत्रीसरकारचे नेते नाना पाटील यांनी उद्घाटन केले. बाबासाहेब पाटील यांनी स्वागतपर भाषण केले. इंदूरच्या ग्रामपंचायतीतर्फे क्रांतिवीर नाना पाटील यांना मानपत्र अर्पण केले गेले. वरील परिषदेत साधारणतः नऊ ठराव पास केले गेले. या ठरावात प्रामुख्याने ठराव क्रमांक दोन मध्ये मराठी भाषिक सोलापूर जिल्ह्यामध्येच मोहोळ तालुका कायम करण्यात यावा अशा आशयाचा ठराव केला गेला होता.

दिनांक 26 जुलै रोजी अक्कलकोट येथील लिंगायत व्यापाऱ्यांनी अक्कलकोट संस्थान हे कर्नाटकात सामील व्हावी अशा प्रकारचा प्रचार करणारी भांडवलदारांच्या सह्यानिशी एक जाहीर विनंती पत्र काढून अक्कलकोट मध्ये जातीयता पसरविण्याचा प्रयत्न केला. परंतु वरील पत्रकातील मजकूर आणि अक्कलकोट संस्थान कर्नाटकात सामील होणे कसे अयोग्य आहे हे पटवून देण्याचे काम सोलापूर येथे भरविण्यात आलेल्या सप्टेंबर इस.1948 च्या शेतकरी कामगार पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात झाले. अक्कलकोट संस्थान लोकशाहीच्या तत्वानुसार संयुक्त महाराष्ट्रातच सामील करण्यात आले पाहिजे याची कारणे खालील प्रमाणे परिषदेने दिलेली आहेत.

1. सांस्कृतिक आणि भौगोलिकदृष्ट्या अक्कलकोट संस्थान कर्नाटकापेक्षा संयुक्त महाराष्ट्रातच सामावते.
2. सुमारे तीन चतुर्थांश लोक अक्कलकोट संस्थानात मराठी बोलणारे आहेत त्यापैकी काहींना कानडी भाषा बोलता येते परंतु त्यांची संस्कृती महाराष्ट्रीयन नाही. तेथे बोलल्या जाणाऱ्या कानडी भाषेचे स्वरूप शुद्ध नसून त्यात मराठी भाषेतील शब्द निश्चित आहेत.
3. विजापूर हे अक्कलकोट पासून 60 मैल दूर आहे तर सोलापूर फक्त20 ते 24 मैलावर आहे.
4. अक्कलकोट संस्थांचे कारभार प्रारंभीपासून ते आजतागायत मराठीतूनच होत आलेले आहे.
5. ब्रिटिश रीजन्सी काळात अक्कलकोटचा कारभार सोलापूरच्या कलेक्टराकडून पाहिला जात होता.

6. अक्कलकोट संस्थान भारतात विलीन करतेवेळी श्रीमंत राजे साहेबांनी आपले संस्थान सोलापूर जिल्ह्यातच सामील करावे असे मुंबई सरकारला सुचविले होते कळविले होते व ते सरकारला उचित वाटल्यामुळे अक्कलकोट संस्थांनाचा कारभार सोलापूर कलेक्टरकडे सोपविला गेला.
7. अक्कलकोटचे दळणवळण सोलापूरशी सुलभपणे होत होते.

वरील प्रमाणे निरनिराळी कारणे देऊन सोलापूर जिल्हा शेतकरी कामगार पक्षाने अक्कलकोट मधील नागरिकांना कर्नाटका ऐवजी संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट व्हावे असे आवाहन केले होते. याशिवाय 20 ऑगस्ट 1948 रोजी भरलेल्या अक्कलकोट शेतकरी कामगार पक्षाच्या सर्वसाधारण सभेत एकमताने ठराव पास करण्यात आला व तो मुंबई सरकारकडे पाठवण्यात आला ठराव हा खालील प्रमाणे होता.

"अक्कलकोट शेतकरी कामगार पक्षाची सभा 20 जुलै 1948 रोजी भरलेली असून ही सर्वसाधारण सभा मुंबई सरकारला विनंती करते की अक्कलकोट संस्थान जातीयवादाच्या धाकटीला बळी पडून ते विजापूर संस्थानाशी संलग्न न करता सर्वदृष्टीने सोयीस्कर अशा सोलापूरशी संलग्न करण्यात यावे."

अक्कलकोट संस्थान हे भारतात विलीन झाल्यानंतर ते महाराष्ट्रात असावे की कर्नाटकात असावे असा मोठा प्रश्न येथील स्थानिक जनतेपुढे उभा राहिला असता या संस्थानाची आजपर्यंतची परंपरा महाराष्ट्राशी संलग्नित असल्याबद्दल व ते महाराष्ट्रातच विलीन व्हावे यासाठी शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष मराठा मंडळ, प्रजा परिषदेतील कार्यकर्ते इत्यादींनी प्रयत्न केले. अक्कलकोटचे महाराष्ट्रातील समावेश याबाबत दहा मुद्द्यांच्या छापील पत्रिका काढून खेडोपाड्यातील जनतेच्या सह्या घेण्याचे कार्य वरील घटकांनी केल्याचे पहावयास मिळते.

सोलापूर जिल्ह्याचे शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र असणाऱ्या साप्ताहिक लोकसेवा मधून मुंबई येथील दादर येथे भरणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे खास अधिवेशन रोजी शिवाजी पार्कवर आयोजित केले गेले होते. परिषदेचे अध्यक्ष बॅरिस्टर, स्वागताध्यक्ष डॉ. गोपाळराव देशमुख होते. भाषावार प्रांतरचना व संकल्पित संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ताबडतोब अमलात आणण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची होती. त्याचप्रमाणे मुंबईतील इतर भाषिक लोकांच्या नजरेस प्रखरपणे भरण्याजागी उतरली पाहिजे म्हणून लोकांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रश्न इतर कोणत्याही महाराष्ट्रीयन प्रदेशांपेक्षा दक्षिण महाराष्ट्रातील लोकांना अधिक जिव्हाळ्याचा आहे म्हणून मराठी भाषिक लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले होते. यावरून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रश्न आपल्या पक्षाच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा आहे याची साक्ष या साप्ताहिकातून दिसून येते.

शेतकरी कामगार पक्षाने तमाम मराठी जनतेला संयुक्त महाराष्ट्र परिषद यशस्वी करण्याचे आवाहन केले. मुंबईसाठी महाराष्ट्रीयन लोकांनी घाम गाळला आहे असे म्हणत भाषावार प्रांतरचनेस मान्यता देण्यात यावी असे भारताचे कायदेमंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषावार प्रांत रचना कमिशनला सादर केलेल्या परिपत्रकात म्हटलेले होते. मध्यवर्ती सरकारची जी सरकारी भाषा ठरेल तीच प्रांतांची सरकारी भाषा राहावी. तसेच मुंबईसाठी महाराष्ट्रीयन लोकांनी घाम गाळला असल्याने व मुंबई महाराष्ट्राचाच भाग आहे म्हणून ती महाराष्ट्रातच राहिली पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या परिपत्रकात म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेचे जोरदारपणे समर्थन साप्ताहिक लोकसेवा माध्यमातून शेतकरी कामगार पक्षाने केल्याचे दिसून येते.

शेतकरी कामगार पक्ष्याच्या कार्यकारी मंडळाची बैठक दिनांक 28 व 29 रोजी शेतकरी कामगार पक्षाचे एक प्रमुख नेते केशवराव यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पक्षाच्या मध्यवर्ती कचेरीमध्ये भरली होती. या सभेत महत्त्वाचे ठराव शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून संमत करण्यात आले. 21 सप्टेंबर 1948 आणि 22 ऑक्टोंबर 1948 रोजी मुंबई कायदेमंडळात बिगर सरकारी कामकाज झाले. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र संबंधित ठराव कायदेमंडळाकडे येऊन त्यावर कायदेमंडळाचे मत व्यक्त केले जाईल अशी अपेक्षा होती. परंतु मुंबई शहर संयुक्त महाराष्ट्रात येणे परप्रांतीय भांडवलदारांना नापसंद आहे आणि त्याच्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्र होऊ नये यासाठी ते प्रयत्न करीत होते, विरोध करीत होते. त्यांच्या या वर्तनाचे, उर्मटपणाचे विरोध शेतकरी कामगार पक्षाने केला. तेव्हा या गुजराती भांडवलदारांच्या विरोधी कारवायांपासून मराठी भाषा बोलणाऱ्या शेतकरी, कामगारांनी योग्य तो धडा घेऊन संघटित व्हावे आणि आपल्या हितासाठी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची वाजवी मागणी अधिक निकडीचे व कणखरपणे करावी अशी या कार्यकारिणीची विनंती आहे.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हा झालाच पाहिजे याच्यासाठी साताऱ्याचे क्रांतिवीर नाना पाटील, देशभक्त काकासाहेब जाधव, सोलापूरचे आमदार तुळशीदास जाधव यांनी ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्याला सुरुवात केली. येथील एका सभेमध्ये क्रांतिवीर नाना पाटील आणि आमदार तुळशीदास जाधव यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हा झालाच पाहिजे यावर विशेष भर दिला. त्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी सांगली, सातारा, कोल्हापूर इत्यादी भागातील अनेक खेडोपाडी तसेच नाशिक, इगतपुरी इत्यादी परिसरामध्ये मुंबई सह संयुक्त महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी लोकांमध्ये जनजागृती केली व अनेक जाहीर प्रचारसभा घेतल्या.

दिनांक 23 जून 1949 रोजी सोलापूर जिल्हा शेतकरी कामगार पक्षाची बैठक शहरात लोकसेवा कार्यालयात दुपारी दोन वाजता भरली असता दादासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्ह्यातील निरनिराळ्या ठिकाणाहून सुमारे शंभर ते दीडशे प्रतिनिधी या बैठकीस हजर होते. सदर बैठकीमध्ये विविध विषयांच्या अनुषंगाने अनेक ठराव पास केले गेले. या संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी संबंधित असणारा ठराव देखील या बैठकीच्या माध्यमातून पास केला गेला. देशातील प्रांतांची पुनर्रचना व्हावी व ही पुनर्रचना भाषावार रचनेचे तत्व डोळ्यासमोर ठेवून करण्यात यावी ही जनतेची मागणी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या पुढे मांडण्याचे महत्त्वाचे कार्य काँग्रेसने केले व त्याप्रमाणे काँग्रेसने वेळोवेळी घोषणा देखील केली. परंतु 15 ऑगस्ट 1947 रोजी देशाच्या स्वातंत्र्यानंतर मात्र सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी भाषावार प्रांतरचनेबाबत अत्यंत प्रतिकूल अशा भूमिका घेतल्या. तेव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे अशी सोलापूर जिल्हा शेतकरी कामगार पक्षाची भूमिका मागणी आहे. संयुक्त महाराष्ट्र झाल्याने व प्रांतांना अंतर्गत कारभाराच्या बाबतीत पूर्ण स्वायत्तता दिल्याने राष्ट्रीय वृत्तीत भरच पडणार असून शेतकरी कामगारांचे राज्य स्थापन होण्यास मदत होणार आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्याशिवाय महाराष्ट्रातील कामगार शेतकरी वर्गाची परप्रांतीय भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक बंद होणार नाही. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने संयुक्त महाराष्ट्राबद्दल जी कचखाऊ भूमिका घेतली आहे त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याची आशा व्यर्थ आहे तेव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या पूर्ततेसाठी शेतकरी कामगार पक्ष ज्या ज्या मार्गाचा अवलंब करेल त्यासाठी तो सोलापूर जिल्हा शेतकरी कामगार पक्ष जरूर तो त्याग करण्यास तयार आहे अशा आशयाचा ठराव वरील बैठकीत पारित करण्यात आला.साप्ताहिक लोकसेवा या दिनांक 7 फेब्रुवारी 1949 च्या अंकात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस श्री. शंकरराव मोरे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या पूर्ततेसाठी खालील मार्गाचा अवलंब करावा असे सुचविले आहे.

1. कायदेमंडळातील मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व सभासदांनी ताबडतोब राजीनामे द्यावेत.
2. मराठी भाषा बोलणाऱ्या मंत्र्यांनी अधिकाऱ्यांचा त्याग करावा.
3. मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्व सभासदांनी समर्थ महाराष्ट्राच्या मागणीसाठी ताबडतोब राजीनामे देऊन याच प्रश्नावर नवीन निवडणुका लढवाव्यात.
4. मराठी भाषिक प्रदेशात संयुक्त महाराष्ट्राची घोषणा होईपर्यंत आम्ही कर देणार नाही अशी घोषणा करून मध्यवर्ती सरकारचे आणि प्रांतिक सरकारचे कर देणे स्थगित करावे.
5. मुंबईसह सर्व मराठी प्रांतात एक दिवसाचा हरताळ पाळावा.
6. अन्य प्रकारे इतर अन्य प्रकारे सत्याग्रहाची चळवळ करणे.

याशिवाय सर्व पक्षाच्या लोकांनी ताबडतोब एकत्रित येऊन संयुक्त महाराष्ट्रासाठी द्यावयाच्या लढ्याचा कार्यक्रम आखावा. शंकरराव देव, डॉ.गोपाळराव देशमुख, बॅरिस्टर रामराव देशमुख, डॉ.धनंजयराव गाडगीळ, गजाननराव माडखोलकर, दत्तोपंत पोतदार यांनी ताबडतोब अशी जाहीर विनंती शेतकरी कामगार पक्षातर्फे केली गेली. मराठी भाषकांची सर्वांगीण सुधारणा संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यावरच अवलंबून आहे त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आपण जरूर तो त्याग करण्यासाठी तयार झाले पाहिजे असे शंकरराव मोरे म्हणतात.

"वर्ष प्रतिपदा आणि महाराष्ट्रीयन जनतेचे कार्य" या दिनांक 28 मार्च 1949 रोजीच्या साप्ताहिक लोकसेवा या शीर्षकाखाली लिहिले गेले आहे की, ज्याप्रमाणे प्राचीन महाराष्ट्रात शालिवाहन शासकांनी पहिले राज्य निर्माण केले. स्वतंत्र राज्य निर्माण करीत असताना प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले. शालिवाहनाने जनतेस जागृत करून दक्षिण भारतात शांतता प्रस्थापित केली. त्याच प्रकारचे कार्य आजच्या घडीला हिंदी संघराज्याच्या शांततेसाठी भाषावार प्रांत रचना होत असता संयुक्त महाराष्ट्र नाकारण्याचा उद्योग काही भांडवलदार व सत्तालोलुप अधिकारी करीत आहेत. तरी या उपद्व्यापाला बळी न जाता आपली मान न झुकविता आपल्या न्याय हक्कासाठी व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आपापसातील मतभेद नाहीसे करून महाराष्ट्रातील लोकांनी खेडोपाड्यातील लोकांच्या सहाय्याने आपले मराठी भाषिक राज्य मुंबई शहरासह साकार करावे. संयुक्त महाराष्ट्र परिषदच हे कार्य करेल अशा आशा न बसता शालीवाहनासारखी धडाडी दाखवून संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्ण इतिहास लिखित इतिहास लिहिण्याचे सदभाग्य आमच्या महाराष्ट्रातील जनतेला व नेत्यांना या नववर्षात होवो अशी अपेक्षा वरील साप्ताहिकाद्वारे व्यक्त केली गेली आहे.मुंबई येथील कामगार वर्गाचे स्नेहसंमेलन सोलापूरचे आमदार तुळशीदास जाधव यांच्या नेतृत्वाखाली खंडाळा येथील संस्कृती संवर्धन केंद्र असलेल्या आनंदाश्रमात पार पडले. सदर प्रसंगी तुळशीदास जाधव यांनी अनेक मोठमोठे कामेही संघटनेच्या मुळे यशस्वी होतात असे सांगून मराठी जनतेपुढे असलेल्या संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्नाचे विवेचन केले. ते म्हणतात की, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा चुटकी सारखा सुटण्यासारखा आहे. मुंबई शहराची उभारणी महाराष्ट्रातील कामगार वर्गानेच केली असून ते केव्हाही महाराष्ट्रातच राहिली पाहिजे यासाठी आपल्या संघटनेची आवश्यकता आहे. अशा आशयाचे अत्यंत स्फूर्तीदायक असे त्यांचे भाषण होते.काँग्रेस सरकारने जनतेला दिलेली आश्वासने विसरली असून काँग्रेसने संयुक्त महाराष्ट्र विरुद्ध अनेक कारवायांना हातभार लावला आहे. सरकारच्या सर्व गंभीर आणि शोभकारक बाबींचा निषेध व्यक्त करण्यासाठी सनदशीर मार्ग म्हणून मी हा राजीनामा देत आहे असे विस्तृत पत्रक काढून शेतकरी कामगार पक्षाचे एक आमदार आर. बी. राऊत यांनी आपल्या पदाचा अर्थात आमदारकीचा राजीनामा दिला.सोलापूर जिल्ह्यातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शेतकरी कामगार पक्षाचे कार्य महत्वाचे राहिले आहे.

## समारोप :

सोलापूर जिल्ह्यातील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शेतकरी कामगार पक्षाचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तमाम मराठी भाषिक शेतकरी, कामगार,कष्टकरी वर्ग इ.ना. सहभागी करून घेण्याचे श्रेय शेतकरी कामगार पक्षालाच द्यावे लागते. शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्गाचे संघटन करून, लोकशाही मार्गाचा स्वीकार करून जनतेच्या चळवळीला आक्रमकरित्या संघटित करून मतदानाच्याद्वारेसत्तांतर घडवून आणले. मुंबईसहसंयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीततसेच महाराष्ट्र राज्याच्या विकासात्मक वाटचालीत शेतकरी कामगार पक्षाचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेआहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

1. भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय शेतकरी कामगार पक्ष जडणघडण आणि वाटचाल (1948 ते 1960), लोकवा:ङमयगृह प्रकाशन, 20 नोव्हेंबर 2010
2. जाधव तुळशीदास सुभानराव (संपा.),शेतकरी कामकरी संघ व सभा घटना, साप्ताहिक लोकसेवा, दि. 21 जून 1948, पान क्र. 03,04
3. पळशीकर सुहास आणि कुलकर्णी सुहास (संपा.), महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष-राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, फेब्रू.2007
4. फडणीस जगन, शेकपा: शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब प्रकाशन, कोल्हापूर,1978
5. मोरे शंकरराव, भारतीय शेतकरी कामगार पक्ष आढावा आणि आराखडा, प्रका. भाई देसाई बाबासाहेब, श्री.मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर,1988
6. डॉ.गायकवाड एस.एन.,सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्य 1980-2005, लक्ष्मी बुक्स पब्लिकेशन्स, पुणे, 13 डिसेंबर 2016
7. जाधव तुळशीदास सुभानराव (संपा.), साप्ताहिक लोकसेवा, दि.14 जून 1948, पान क्र. 02
8. जाधव तुळशीदास सुभानराव (संपा.), साप्ताहिक लोकसेवा, दि.21 जून 1948, पान क्र. 02
9. उपरोक्त, पान क्र. 03
10. कामतकर व्यंकटेश, महाराष्ट्राचे शिल्पकार स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई